भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याचा पाया माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी रचला >> पान 2

अनवा येथे खडी क्रेशरवर बेकायदेशीररित्या राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना एटीएसच्या पथकाने घेतले ताब्यात >> पान 3

प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या तिघांवर शहर पोलिसांची कारवाई >> पान 4

सुविचार

अनुभव हे ज्ञानाचे सर्वोत्तम शिक्षक आहेत.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'कंतारा' फेम ऋषभ शेट्टी या दिग्दर्शकासोबत काम करण्यास उत्सुक, कारणही झाले उघड

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 138 ■ रविवार, दि. 29 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## वक्फ बोर्डाच्या धर्तीवर सनातन बोर्ड बनवावे; कथावाचक देवकीनंदन ठाकूर यांची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** वक्फ बोर्डाच्या धर्तीवर देशात सनातन बोर्डाची स्थापना करावी आणि सनातनचा प्रचार व्हावा यासाठी सरकारने त्या मंडळाला आर्थिक मदत करावी, अशी मागणी निवेदक देवकीनंदन ठाकूर यांनी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे. सनातन बोर्डा मध्ये सरकारी हस्तक्षेप असू नये, मंदिरे सरकारच्या अधिपत्याखाली असू नये. सनातन बोर्डाच्या निर्मितीसाठी प्रत्येक हिंदूने आपले योगदान द्यावे आणि २७ जानेवारीला प्रयागराज महाकुंभ मध्ये होणाऱ्या सनातनी धर्म संसदेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन देवकीनंदन ठाकूर यांनी केले आहे.

## चंद्रभागा नदीने घेतला मोकळा श्वास, चंद्रभागेची स्वच्छता करण्यास सुरुवात वारकरी, नागरिकांतून समाधान व्यक्त





दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** अस्वच्छ झालेल्या चंद्रभागेची आता स्वच्छता करण्यास सुरुवात झाली आहे. चंद्रभागेच्या पात्रातील अस्वच्छतेबाबत माध्यमांनी आवाज उठवल्यानंतर आता पालिका प्रशासन, व मंदिर समिती खडबडून जागे झाले आहे आणि प्रशासनाकडून आता मंदिर समिती अंतर्गत पुणे येथील ओम एंटरप्राइजेस कंपनीमार्फत आउटसोर्सिंग पद्धतीने घेतलेले कर्मचारी व मंदिर समितीचे कर्मचारी यांनी पुंडलिक मंदिर परिसर, चंद्रभागा घाट ते जुना दगडी पूल येथील सर्व घाट निर्मल्य, कपडे, प्लास्टिक इत्यादी वस्तूंची स्वच्छता केली २ दिवसात ३० ते ३५ कर्मचाऱ्यांनी जवळपास २० टन कचरा गोळा केल्याने नागरिक, वारकरी, या सह वारकरी संप्रदायातूनही समाधान व्यक्त होत आहे. या स्वच्छता मोहिमेसाठी पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने ट्रॅक्टर जेसीबी व टिपर देण्यात आले होते.

## पोस्टाने मागविलेल्या तलवारीसह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकान एकास घेतले ताब्यात

**जालना /प्रतिनिधी :** मागील काही महिन्यांपासून जालना शहरामध्ये पोस्टाने तलवारी आणि खंजीर मागवण्याचे प्रकार खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्या अनुषंगाने पोलीस प्रशासन सुद्धा या प्रकरणाकडे आपली करडी नजर ठेवून आहे. या पार्श्र्वभूमीवर आज सकाळी जालना शहरातील ढवळेश्र्वर येथे पोस्टाने मागविलेल्या तलवारी घेऊन जात असताना एका संशयीत युवकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून रंगेहात पकडले आहे. कृष्णा शांतीलाल राजपूत वय २६ वर्षे राहणार निधोना असे या संशयित आरोपीचे नाव आहे. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी दोन तलवारी हस्तगत केल्या आहेत. आरोपी विरोधात चंदनझीरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात येत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी दिली आहे.



# गुन्हेगारीविरोधात सर्वपक्षीय आक्रोश

## संतोष देशमुख हत्या प्रकरण मुंबईला वर्ग करा

दैनिक आपला विदर्भ



**बीड /प्रतिनिधी : मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेला १९ दिवस पूर्ण झाले आहेत. या घटनेवरून राजकारण देखील तापले आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज बीडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून मूक मोर्चा काढण्यात आला. आरोपीला फाशी झाली पाहिजे, अशा प्रकारच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावामध्ये कडकडीत बंद आहे.**





बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी आज बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चानंतर आयोजित करण्यात आलेल्या सभेत सर्वच पक्षांच्या नेत्यांनी एका सुरात या प्रकरणी वाल्मीक कराड याला अटक करण्याची व मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख यांनी 'आरोपींना शिक्षा होईपर्यंत लढा देणार आहे. तुम्ही आज माझ्या कुटुंबासोबत मोठ्या संख्येने उपस्थित आहात. तसेच माझ्यासोबत राहा' अशी भावना व्यक्त केली.

या घटनेचा मुख्य सूत्रधार अद्यापही पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्यामुळे विरोधक–सत्ताधारी यांच्यात देखील आरोप–प्रत्यारोप सुरू आहेत. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा, प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे, ज्येष्ठ विधीतज्ज्ञांची नियुक्ती करावी, अशा मागण्या केल्या जात आहेत. दरम्यान देशमुख यांचे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे, अशी मागणी मराठा क्रांती ठोक मोर्चाकडून जोर धरत आहे.

देशमुख यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी आज बीडमध्ये भव्य मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात खासदार संभाजीराजे छत्रपती, मनोज जरांगे पाटील, भाजपाचे आमदार सुरेश धस, शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर, इत्यादी नेते सहभागी झाले होते.

देशमुख यांचे अपहरण आणि हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे, सर्व आरोपीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी, त्याचप्रमाणे या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी. या प्रकरणामध्ये ज्येष्ठ विधी तज्ज्ञ उज्ज्वल निकम व विधी तज्ज्ञ सतीश माणशिंदे यांची नियुक्ती व्हावी, त्याचप्रमाणे राजकीय हस्तक्षेपामुळे देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळू देणार नाही, यासाठीच हे प्रकरण मुंबईला वर्ग करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बीडचा मोर्चा आहे तो सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय देण्यासाठी आहे. त्यांच्या मुलीला, त्यांच्या आईला, पत्नीला, त्यांच्या भावाला, न्याय देण्यासाठी या मोर्चाचा आयोजन केले आहे. या मोर्चाला बीडसह राज्यभरातून जनतेचा प्रतिसाद मिळत आहे. त्याचबरोबर सर्व संघटना आलेल्या आहेत. आम्ही दोन दिवसाचा अल्टीमेटम सरकारला दिला होता. त्यांनी दोन दिवसामध्ये मोर्चापूर्वी वाल्मिक कराडला आणि त्याच्या गुंडांना ताब्यात घ्यायला सुरुवात करायला पाहिजे होती. सरकार कारवाई केल्यासारखं दाखवते, पण अद्याप आरोपी मोकाट फिरत आहेत. आज १९ दिवस झाले आहे तरी या प्रकरणातील सूत्रधार मोकाट फिरतो आहे. आमच्या सर्वांचा एकच म्हणणं आहे. या मोर्चातून सरकारने धडा घ्यावा, बोध घ्यावा आणि तात्काळ या प्रकरणातील आरोपींना अटक करावी. त्याचबरोबर ही टोळी चालवणारा आणि टोळीतला एका–एका लोकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करावी, तसे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. मात्र, ते कधी लावणार असा प्रश्न आहे. तो जो वाल्मिक कराड आहे, त्याला प्रमुख आरोपी करा आणि जितके आरोपी आहेत त्यांना फाशीची शिक्षा द्या. फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून हे प्रकरण चालवा, अशी आमची मराठा क्रांती मोर्चाच्या माध्यमातून मागणी आहे. यामध्ये वाल्मिक कराड आणि सर्व आरोपींना फाशीपर्यंत पोहोचवण्यासाठी उज्वल निकम आणि सतीश मानशिंदे यांची नियुक्ती करावी. हे प्रकरण बीडमध्ये न ठेवता हे प्रकरण मुंबईमध्ये वर्ग करण्यात यावे, कारण बीडमध्ये जर हा खटला चालवला तर राजकीय हस्तक्षेप होईल आणि या कुटुंबाला न्याय मिळणार नाही आणि यासाठी सरकारला शेवटचा अल्टिमेटम दिला आहे, सरकारने तात्काळ याबाबतचा निर्णय घ्यावा, अन्यथा याच्या परिणाम सरकारला भोगावे लागतील, असे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## प्रॉपर्टीच्या वादातून राग अनावर, तीन जणांनी गळा दाबून एकास संपवलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** कुर्ल्यातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. प्रॉपर्टीच्या वादातून एका ५० वर्षीय व्यक्तीची गळा दाबून हत्या करण्यात आली आहे. काझम हुसेन मिर्झा बेग असे या मयत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी कुर्ला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मागील १० ते १५ वर्षांपासून आरोपी आणि मयत काझम हुसेन मिर्झा बेग यांच्यात प्रॉपर्टीवरून वाद सुरु होते. याच वादातून राग विकोपाला गेल्याने तीन जणांनी काझम हुसेन मिर्झा बेग यांची गळा दाबून हत्या केली आहे. या हत्येप्रकरणी कुर्ला पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. सफदर हुसेन सय्यद, शबरेज हुसेन सय्यद, वासीफ हुसेन सय्यद, अशी त्यांची नावे आहेत. या घटनेमुळे कुर्ल्यात एकच खळबळ उडाली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, बाबा सिद्धीकी हत्या प्रकरणात लवकरच गुन्हे शाखेचे पोलीस आरोपपत्र दाखल करणार आहेत. या प्रकरणी एकूण २६ आरोपींना पोलिसांनी आतापर्यंत अटक केली असून या आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले जाणार आहे.

## अजितदादा तुमच्यात धमक असेल तर धनंजय मुंडेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा, संभाजीराजेंचा थेट प्रहार

**बीड /प्रतिनिधी :** अजितदादा तुमच्यात धमक असेल तर धनंजय मुंडेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा, असा थेट हल्लाबोल संभाजीराजे छत्रपती यांनी केला आहे. अजितदादा तुमची काम करण्याची पद्धत ही परखडपणाची असेल तर आता तुम्ही करेक्ट कार्यक्रम करा असे संभाजीराजे म्हणाले. मला माहित नाही त्यांचा राजीनामा घेतील की नाही. पण बीडच्या सगळ्या जनतेला मला सांगायचं आहे की, त्यांना जर (धनंजय मुंडे) पालकमंत्रीपद दिलं तर छत्रपती घराणं बीडचं पालकत्व गेणार असल्याचे संभाजीराजे म्हणाले. आम्हाला दहशत नाही. दहशत चालत असले तर माझे इथे येणे कर्तव्य असल्याचे संभीजीराजे म्हणाले. बीडचा बिहार करायचा आहे का? असा सवाल देखील संभाजीराजेंनी केला.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या विरोधात बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला, त्यावेळीसंभीजीराजे बोलत होते. हा मोर्चा बघा सर्व जातीय लोक या मोर्चात सहभागी झाले आहेत. एवढ्या उन्हात हजारो लोकं बसले आहेत. एकजण देखील उठून गेलेला नाही. पत्र्याच्या छतावर लोकं बसले आहेत. संतोष देशमुख यांच्यासाठी, माणुसकीसाठी हे लोकं बसले आहेत. बीडची दहशत संपवली पाहिजे असेही संभाजीराजे म्हणाले. मंत्री महोदय स्वत: बंदूक हातात घेतात. आम्हाला बंदुकीची परवानगी आहे, पण आम्ही कधी दाखवली का? असेही संभाजीराजे म्हणाले.



या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आम्हाला पारदर्शकपणे काम करणारा अधिकारी द्या असेही संभाजीराजे म्हणाले. माणुसकी जपण्यासाठी हे सगळं लोक इथं जपले आहेत. राजकाराणाच्या पलिकडे जाऊन आपण विचार करु असेही संभाजीराजे म्हणाले. बीड जिल्ह्यात सुरु असलेली दहशत संपली पाहिजे असेही संभाजीराजे म्हणाले. आमच्या रक्तात बंदुक धरणे, तलवार धरणे आहे, पण आम्ही कधी दाखवलं का? असेही संभाजीराजे म्हणाले. संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत मी तुमच्यासोबत असल्याचे संभाजीराजे म्हणाले.

# जोपर्यंत वाल्मिक कराडला अटक होत नाही तोपर्यंत बीड सोडणार नाही, मुंडेना मंत्रीपद सोडायला भाग पाडू


## अंजली दमानियांचा बीडमध्ये एल्गार!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** शरद पवार यांनी धनंजय मुंडे यांचे अनेक कारनामे पाठीशी घातल्याचं म्हटलं होतं. त्याच प्रवृत्ती वाल्मिक करांडासारख्या व्यक्तींना मोठं करत आहेत. त्यामुळे जोपर्यंत वाल्मिक कराडला अटक होत नाही तोपर्यंत आम्ही बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिया देणार असल्याचा एल्गार सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. अंजली दमानिया यांनी आज बीडमध्ये निघत असलेल्या सर्वपक्षीय मोर्चामध्ये सहभागी होणार नसल्याचे म्हटलं आहे. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत वाल्मिक कराडला अटक होत नाही तोपर्यंत ठिय्या आंदोलन करणार असल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांना मंत्रीपद सोडायला भाग पाडत नाही तोपर्यंत ठिय्या देत राहू असेही त्यांनी म्हटलं आहे.

संतोष देशमुख प्रकरणातील ३ आरोपींची हत्या

दरम्यान, दमानिया यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील



पोलिसांनी पकडले नसलेल्या तीन आरोपींबाबत मोठा दावा केला आहे. या प्रकरणात पकडले जात नसलेल्या ३ आरोपींचा खून झाल्याचा गंभीर आरोप अंजली दमानियांनी केला आहे. याबाबत मला फोन आल्याचा दावा त्यांनी केला. ही माहिती आपण पोलिसांना दिल्याचे दमानिया यांनी सांगितले. धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजिनामा अजूनही का घेत नाहीत? असा सवालही दमानिया यांनी केला. दरम्यान, बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन २० दिवस उलटले, पण अजूनही अन्य आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलेलं नाही. या हत्येच्या निषेधार्थ आज बीडमध्ये सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मार्चा सकाळी अकरा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघणार आहे.

# भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याचा पाया माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी रचला

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारताला जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या वाटेवर नेवून प्रगत राष्ट्र निर्माण करणारे जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन ही देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्राची मोठी हानी आहे, अशी दुःखद संवेदना केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत डॉ.मनमोहन सिंग यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी जाऊन त्यांच्या पार्थिवाचे दर्शन आज सकाळी केंद्रीय आयुष, आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतले.

या दुःखद प्रसंगी आपल्या शोकसंवेदना व्यक्त करतांना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याचा पाया डॉ.मनमोहन सिंग यांनी रचला. गेल्या अनेक दशकात आलेल्या प्रत्येक जागतिक मंदीसमोर भारताची अर्थव्यवस्था पाय घट्ट रोवून भक्कमपणे उभी राहिली. डॉ.मनमोहन सिंग यांनी १९९१ च्या आर्थिक संकटात आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाची धोरणे राबवून भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबूत आधार दिला. अर्थमंत्री म्हणून त्यांनी परकीय चलनाचा साठा वाढवून आणि आयएमएफकडून मदत घेऊन भारताला दिवाळखोरीपासून वाचवले. त्यांचा साधेपणा, नम्रता आणि राष्ट्राप्रती समर्पण सदैव आपल्या हृदयात राहील. त्यांचा वारसा आम्हाला प्रेरणा देत राहील. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुद्धा माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या संसदेतील व्यापक कार्याबद्दल प्रशंसा व्यक्त केली आहे.

सन २००९ ते २०१४ या कालावधीत मला लोकसभा सदस्य या नात्याने त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या जाण्याने देशावर शोककळा पसरली असून हे देशाचे कधीही भरून न येणारे नुकसान आहे. या दु:खद क्षणी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी त्यांच्या कुटुंबियांप्रती आणि प्रियजनांप्रती मनापासून संवेदना व्यक्त करतो, देव त्यांना हे अपरिमित नुकसान सहन करण्याची शक्ती देवो.

त्यांच्या निधनाने देशाचे सभ्य, सुसंस्कृत, विश्र्वासार्ह नेतृत्व हरपले आहे. देश आपल्या सुपुत्राला मुकला आहे. देशाचे यशस्वी अर्थमंत्री, साहसी पंतप्रधान आणि जनमानसाचा विश्र्वास प्राप्त केलेला नेता म्हणून ते कायम स्मरणात राहतील. त्यांना केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री या नात्याने मी श्रद्धाजंली अर्पण करतो, अशा शब्दांत त्यांनी शोकभावना व्यक्त केल्या.



## सुरेश धस, तुम्ही सर्व महिलांचा अपमान केला; माझी माफी मागा– प्राजक्ता माळी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील राजकारण्यांना अशा प्रकारची भाषा शोभत नाही; असे सांगत सुरेश धस यांनी माझी माफी मागावी, अशी मागणी अभिनेत्री प्राजक्ता माळीने शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत केली. या प्रकरणी आपण महिला आयोगाकडे तक्रार केल्याचे प्राजक्ताने सांगितले. तसेच मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी लक्ष घालावे अशी विनंती तिने केली. या पत्रकार परिषदेसाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जाहिरात धस यांनी जे काही वक्तव्य केले त्याचा निषेध करण्यासाठी मी इथे आली आहे. गेली अनेक दिवस मी हे सर्व शांतपणे सहन करत आहे.

महाराष्ट्रातील राजकारण्यांना अशा प्रकारची भाषा शोभत नाही; असे सांगत सुरेश धस यांनी माझी माफी मागावी, अशी मागणी अभिनेत्री प्राजक्ता माळीने शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत केली. या प्रकरणी आपण महिला आयोगाकडे तक्रार केल्याचे प्राजक्ताने सांगितले. तसेच मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी लक्ष घालावे अशी विनंती तिने केली. या पत्रकार परिषदेसाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

धस यांनी जे काही वक्तव्य केले त्याचा निषेध करण्यासाठी मी इथे आली आहे. गेली अनेक दिवस मी हे सर्व शांतपणे सहन करत आहे. मात्र माझी शांतता म्हणजे मुकसंमती आहे असे नाही. कलाकारांची शांतता म्हणजे हतबलता आहे, असे प्राजक्ताने सांगितले. मी शांत बसले कारण मला चिखलफेकीत पडायचे नव्हते. ही विषय इतकी खोटी आहे ज्याला काही आधार नाही. एका कार्यक्रमात सत्कार करत असताना आमची झालेली भेट आणि तेव्हा काढलेला फोटो त्यामुळे मी यात पडले नाही. या काळात माझ्या कुटुंबियांनी आणि चित्रपट क्षेत्रातील मित्रांनी साथ दिल्याचे प्रजक्ताने सांगितले.

आज ही वेळ येते ही नामुष्की आहे. आज एक लोकप्रतिनिधी यावर बोलतात त्यामुळे मला बोलावे लागते. धस त्यांनी असे वक्तव्य केल्यामुळे मला समोर यावे लागले. एखादा लोकप्रतिनिधी असे बोलतो तेव्हा ते गंभीर होते.

तुमच्या राजकारणात तुम्ही आम्हाला का आणता असा प्रश्र्न यावेळी प्राजक्ता माळीने विचारला. बीडमध्ये कधी पुरुष कलाकार गेला नाही का? फक्त महिला कलाकार जातात का? असा सवाल तिने उपस्थित केला. पण धस यांनी तसे केले नाही. त्यांनी स्वत:चा टीआरपी वाढवण्यासाठी, स्वत:च्या फायद्यासाठी अनेक महिलांची नावे घेतली. एका फोटोवरून तुम्ही कोणाबद्दल काहीही बोलणार का? अशा प्रकारचे वक्तव्य करुन तुम्ही स्वत:ची मानसिकता दाखवता असे तिने सांगितले. तुमच्या राजकारणासाठी सिने क्षेत्रातील महिलांचा वापर करू नका, अशी विनंती प्राजक्ताने केली. या प्रकरणी आपण मुख्यमंत्र्यांशी फोनवरून बोलोल असून भेटीसाठी वेळ मागितली आहे. मुख्यमंत्र्यांना मी उद्या भेटणार असल्याचे प्रजाक्ताने सांगितले.

## बुमराह आऊट होताच काळजाचा ठोका चुकला, डीएसपी सिराजचा मास्टरक्लास डिफेन्स अन् नितीशचे पहिलं शतक; एमसीजीवर टाळ्यांचा कडकडाट

**मुंबई/प्रतिनिधी :** जेव्हा बॉर्डर गावस्कर ट्रॉफीसाठी त्याची निवड झाली तेव्हा अनेकांच्या त्याच्या निवडीवर शंका उपस्थित केली होती. हा कोण असाच प्रश्न निर्माण करण्यात आली. मात्र, त्याच अवघ्या एकवीस वर्षीय नितीश कुमार रेड्डीनं मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर टीम इंडियासाठी मसिहा ठरला. नितीशने एमसीजीवरील पहिल्याच खेळीमध्ये तडाखेबाज शतकाची नोंद केली. त्यामुळे टीम इंडिया पराभवाच्या छायेतून बाहेर पडली आहे. टीम इंडिया अडचणीत असताना नितेश कुमार रेड्डीनं सातत्याने मालिकेमध्ये दमदार खेळी केली आहे. मात्र, त्याचं आजचं पहिलंवहिलं शतक संकटात सापडलं होतं. मात्र, डीएसपी मोहम्मद सिराज त्याच्या मदतीसाठी धावून आला. त्याने केलेल्या तीन चेंडूतील मास्टर क्लास डिफेन्समुळे नितीशला एमसीजीवरील आणि क्रिकेट कारकिर्दीमधील पहिल्या शतकाची नोंद करता आली.

## बॉलिवूडचे पाहिले सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांचा आज जन्मदिन. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट साबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है.... we all miss you..... राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

## 'कंतारा' फेम ऋषभ शेट्टी या दिग्दर्शकासोबत काम करण्यास उत्सुक, कारणही झाले उघड

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता ऋषभ शेट्टी त्याच्या खास शैलीतील चित्रपटांसाठी ओळखला जातो. त्याचा 'कंतारा' हा चित्रपट त्याचे उत्तम उदाहरण आहे. या चित्रपटासाठीच त्याला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. सध्या ऋषभ त्याच्या आगामी 'जय हनुमान' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ऋषभ शेट्टी नुकताच राणा दग्गुबतीचा शो 'राणा दग्गुबती शो'मध्ये दिसला होता. यादरम्यान त्यांनी 'निमल'चे दिग्दर्शक संदीप रेड्डी वंगा यांचे कौतुक केले आणि सांगितले की मला त्यांच्यासोबत काम करायचे आहे.

ऋषभ शेट्टीने राणा डग्गुबतीच्या शोमध्ये सांगितले की, संदीप रेड्डी वंगासोबत कोणत्याही प्रोजेक्टमध्ये काम करण्याची संधी मिळाली, तर तो नक्कीच करेल. याशिवाय संदीप रेड्डी वंगा यांची दृष्टी अतुलनीय असल्याचेही त्याने सांगितले. तो म्हणतो की, तो त्याच्या चित्रपटांमध्ये जी जादू निर्माण करतो, ती पुन्हा कधीच पुन्हा करणार नाही.

ऋषभ शेट्टी शोमध्ये म्हणाला, त्याची दृष्टी पूर्णपणे अतुलनीय आहे, कोणीही त्याच्या पद्धतीने विचार करू शकत नाही. आणि मला वाटते की तो स्वतः त्याच दृष्टीकोनातून पुन्हा विचार करणार नाही आणि आजकाल तो ज्या प्रोजेक्टमध्ये काम करतोय त्यात मला संधी मिळाली, तर मला त्याच्यासोबत त्या प्रोजेक्टमध्ये काम करायला आवडेल. कारण मी त्याचा खूप मोठा चाहता आहे आणि तुम्ही याला माझे वेडेपण म्हणू शकता. तथापि, संदीप रेड्डी वंगा हे आजकाल सर्वात लोकप्रिय दिग्दर्शकांपैकी एक आहेत. 'ॲनिमल'च्या यशानंतर त्याची लोकप्रियता खूप वाढली आहे.













DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### घाटकोपर मध्ये ही कुर्ल्याची पुनरावृत्ती टेम्पो ने चिरडले , एक मयत, चार जखमी




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** कुर्लाची बेस्ट अपघात घटना ताजी असतानाच घाटकोपर मध्ये देखील एक टेंपो चालकाने भाजी मार्केट मध्ये गाडी घुसवून पाच जणांना चिरडल्याची घटना घडली आहे. घाटकोपरच्या चिराग नगर मार्केट मध्ये ही घटना घडली आहे. या घटनेत प्रीती रितेश पटेल या महाराष्ट्रात महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे.तर रेश्मा शेख, मारूफा शेख, तोफा शेख आणि मोहरम अली अब्दुल रहीम शेख हे पादचारी जखमी आहेत.या प्रकरणी चालक उत्तम बबन खरात याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.चिराग नगर मार्केट मध्ये शिरतानाच अचानक चालकाचे नियंत्रण सुटले आणि त्याने बाजारात आलेल्या पाच जणांना चिरडले. स्थानिकांनी जखमींना राजवाडी रुग्णालयात उपचारासाठी नेले.घटनास्थळी घाटकोपर पोलीस दाखल झाले आणि त्यांनी चालक आणि टेम्पो ला ताब्यात घेतले आहे.रात्री उशिरा पर्यंत या बाबत पोलिसांचा तपास सुरू होता.



### रावेर व यावल तालुक्यातील गारपिटीच्या नुकसानीची आमदार अमोल जावळे यांनी केली पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** रावेर विधानसभा क्षेत्रात दिनांक २७ डिसेंबर रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि भीषण गारपिटीमुळे केळी, हरभरा, गहू, तूर, पपई अशा विविध पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार अमोल जावळे यांनी जळगाव जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि विभागीय अधिकाऱ्यांसोबत यावल तालुक्यातील भालोद, बामणोद, आमोदा, म्हैसवाडी, राजोरा, बोरावल आणि परिसरातील शेतशिवारांना भेट दिली.

### कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची रात्री विशेष स्वच्छता मोहीम



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रस्ते स्वच्छतेसाठी रात्रीच्या वेळी विशेष मोहीम सुरू केली आहे. रात्री दहा वाजल्यापासून पहाटे तीन वाजेपर्यंत पावर स्विपिंग मशीन आणि २०० कर्मचारी रस्त्यावर उतरून स्वच्छता करत आहेत. धूळ प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा अभ्यास गेल्या महिनाभरापासून राबवला जात आहे. मुंबईसह अन्य शहरांमध्ये धूळ प्रदूषणाचा वाढता धोका लक्षात घेऊन, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आणि राज्य सरकारच्या निर्देशांनुसार, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रस्ते स्वच्छतेचा विशेष अभ्यास सुरू केला आहे. या मोहिमेत पालिकेने सीएनजीवर चालणाऱ्या पावर स्विपिंग मशीन आणि इतर आधुनिक यंत्रांचा वापर करून डीप क्लीनिंग मोहीम राबवली आहे. या मोहिमेअंतर्गत, दिवसा गाड्यांची गर्दी असल्याने रात्रीच्या वेळेत रस्त्यांची स्वच्छता केली जात आहे. रात्री स्वच्छता करून, रस्त्याच्या कोपऱ्यांवर साचलेला कचरा ठेवल्या जातो. सकाळी नियमित सफाई गाड्यांद्वारे तो कचरा उचलला जातो.महापालिकेची ही योजना नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाची असून, रस्त्यांवरील धूळ प्रदूषण कमी करण्यासाठी सकारात्मक पाऊल ठरत आहे.

# अनवा येथे खडी क्रेशरवर बेकायदेशीररित्या राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना एटीएसच्या पथकाने घेतले ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील अनवा या गावात एका खडी क्रेशर वर ३ बांगलादेशी नागरिकांना बेकायदेशीर रित्या वास्तव्यास असल्याची गुप्त माहिती एटीएस दहशतवाद विरोधी पथक नाशिक येथील दहशतवादी पथकातील पोलीस निरीक्षक प्रताप गिरी यांना गुप्त माहिती मिळाली होती. आणि त्या माहितीवरूनच या ठिकाणी दहशतवाद विरोधी पथकाने छापा टाकला असता त्यावेळी त्या ठिकाणी तीन बांगलादेशी नागरिक आढळून आले.



सदरची कारवाई ही काल दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी सात वाजता केली असून या तिन्ही नागरिकांना पारध पोलीस ठाणे येथे आणत त्यांची कसून चौकशी केली असता त्यांची नावे -१ इमदाद हुसेन वय २६ वर्ष राहणार मूळचा काबिल नियरबाडी थाना शेणवा तहसील काजीर्गण जिल्हा नेवाखाली, बांगलादेश २- हुमायून कबिर महमद वय४० वर्ष राहणार मूळचा काबिल नियरबाडी थाना शेणवा तहसील काजीर्गण जिल्हा नेवाखाली. बांगलादेश ३- मनिक जेंनुल्लादिन खान वय ४२ वर्ष मूळ रहिवाशी बेपारी मुंशी कांदी तहसील बेदरगंज जि. शौकीपूर बांगलादेश अशी या बांगलादेशी नागरिकांची नावे असून त्यांची सुमारे १० तास पारध पोलीस ठाणे येथे एटीएसच्या पथकाने व पारध पोलिसांनी कसून चौकशी केली असून त्यांना ताब्यात घेतले आहे,

त्यांच्या विरोधात फिर्यादी सुरेश चंद्रभान खिल्लारे पोलीस हेडकॉन्स्टेबल यांच्या फिर्यादीवरून परकीय नागरिक आदेश १९४८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष माने हे करीत आहे अशी माहिती आज दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी पाच वाजता स्वतः पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी दिली आहे.

## रेल्वेचे फाटक बंद असल्यानं प्रवाशांवर मृत्यूची टांगती कुऱ्हाड; पालघरमध्ये रेल्वेच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**पालघर/प्रतिनिधी :** मुंबईची जीवनवाहिनी ठरलेल्या उपनगरीय आणि अन्य एक्सप्रेस गाड्यांमुळे वर्षभरात अडीच हजार जणांचा बळी जातो. कधी अपघात प्रवाशांच्या चुकीमुळे तर कधी रेल्वे प्रशासनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे मृत्यू होत असतात. पालघरमध्येही पूर्व आणि पश्चिमेला जाण्यासाठी पर्यायी मार्ग नसल्यानं लोकांना रेल्वेचे रूळ ओलांडावे लागतात. त्यातून अपघात होत असून अनेकांना आपले जीव गमवावे लागतात.

पालघर येथे रेल्वेनं हनुमान मंदिर चौक येथील फाटक बंद ठेवलं आहे. त्यामुळे त्या भागात जाणाऱ्या नागरिकांसाठी पर्यायी कोणताच मार्ग नसल्यानं रेल्वे रुळ ओलांडावे लागतात. कधी-कधी रेल्वेच्या वेगाचा अंदाज न आल्याने लोक घाईघाईत रूळ ओलांडण्याचा प्रयत्न करतात. त्यातून अनेक अपघात घडतात. उपनगरीय रेल्वेकडून मिळालेल्या आकडेवारीचा विचार करता सर्वाधिक अपघाती मृत्यू हे रेल्वे रूळ ओलांडताना होतात.

बिहारमधील दोन मजूर ठार-पालघरमध्ये शुक्रवारी रात्री अशीच एक घटना घडली. बिहार राज्यातील मोतिहारी जिल्ह्यातील तरुण रोजगारानिमित्त पालघर जिल्ह्यात आले आहेत. बोईसर पूर्वेला एका उद्योगात वेल्डिंग आणि इतर काम करणारे हे मजूर गृहोपयोगी वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालघरला आले होते. गृहोपयोगी वस्तूंची खरेदी करून ते पूर्वेकडे जाण्यासाठी बंद असणारे फाटक ओलांडत होते. त्यावेळी मुंबईहून जयपूरकडे जाणारी सुपरफास्ट एक्सप्रेस एका ट्रॅकवरून येत होती. तर दुसऱ्या ट्रॅकवरून उपनगरीय गाडी येत असल्याने दोन ट्रॅकच्यामध्ये हे तिघे थांबले. भरधाव गाडी आल्यानं या गाडीचा धक्का लागून दोघांचा मृत्यू झाला. तरी एक जण जखमी असून त्याला रुग्णालयात दाखल केलं आहे.

मृत्यूचे चक्र सुरूच राहणार का?-गेल्या अनेक वर्षांपासून पालघर रेल्वे फाटक बंद करण्यात आलं आहे. परंतु त्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग रेल्वेनं उपलब्ध करून दिला नसल्यानं नागरिकांना नाईलाजाने रेल्वे फाटक ओलांडून पूर्व-पश्चिम असा प्रवास करावा लागतो. असा प्रवास करणाऱ्यांची संख्या शेकडोत आहे. त्यात येथून उपनगरी आणि एक्सप्रेस गाडीची संख्या मोठी असल्यानं प्रवाशांना जीव मुठीत घेऊनच रेल्वे रूळ ओलांडावे लागतात. याबाबत रेल्वे प्रशासनानं पर्यायी व्यवस्था नागरिकांना उपलब्ध करून दिली नाही तर मृत्यूचं हे चक्र असेच चालू राहण्याची शक्यता आहे. उपनगरीय लोकलमुळे दरवर्षी जाणाऱ्या बळींची संख्या पाहिली, तर 'लोकल ट्रेन' या 'डेथ ट्रेन' झाल्या आहेत, असे एकंदरीत चित्र आहे. त्यातच रेल्वेखाली आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाणही जास्त आहे. मुंबई उपनगरीय क्षेत्रात कल्याण खालोखाल पालघर येथे रेल्वेखाली सर्वाधिक आत्महत्या होतात, असे रेल्वेची आकडेवारी सांगते.

### भारत तीनशे पार, फॉलोऑन टळला

**मुंबई /प्रतिनिधी :** बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी अंतर्गत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चौथा कसोटी सामना मेलबर्नच्या क्रिकेट मैदानावर खेळवला जात आहे. आज सामन्याचा तिसरा दिवस आहे. भारतीय संघ फलंदाजी करत असून भारताच्या संघाने ३०० पार धावसंख्या केली आहे. त्यांचे ७ विकेट बाद झाले आहेत. वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश कुमार रेड्डी मैदानावर टिच्चून फलंदाजी करत आहेत. भारताने तीनशे पार धावसंख्या नेल्याने त्यांच्यावरील फॉलोऑनचा धोका टळला आहे. नितीश कुमार रेड्डीने शानदार अर्धशतक ठोकले आहे. तर वॉशिंग्टन सुंदरनेही चांगली साथ दिली आहे. त्याच्या जोरावर भारताला फॉलोऑन टाळता आला आहे. याआधी ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. यात स्टीव्हन स्मिथने १४० धावांची शानदार खेळी केली.

तर जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ४ विकेट घेतल्या. याआधी दुसऱ्या दिवशी भारताकडून पहिल्या डावाची सुरूवात करण्यासाठी रोहित शर्मा आणि यशस्वी जायसवाल उतरले होते. मात्र रोहित शर्मा दुसऱ्याच षटकांत कांगारूंचा कर्णधार पॅट कमिन्सच्या बॉलवर बाद झाला. तर केएल राहुल योग्य लयीत वाटत असतानाच तो पॅट कमिन्सच्या बॉलवर बोल्ड झाला. यानंतर कोहली आणि यशस्वीने मिळून १०२ धावांची भागीदारी केली. मात्र चोरटी धाव घेण्याच्या नादात यशस्वी जायसवाल ८२ धावांवर बाद झाला. यानंतर विराट कोहलीही बाद झाला. त्यानंतर नाईट वॉचमन म्हणून आलेला आकाशदीपही शून्यावर बाद झाला. या पद्धतीने यशस्वी, कोहली आणि आकाशदीप यांचे विकेट ६ धावांत पडले.

## बीडमध्ये सर्वपक्षीय मूक मोर्चा सुरु असतानाच प्रकाश आंबेडकर सीएम फडणवीसांच्या भेटीला, सागर बंगल्यावर तासभर चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण आणि परभणीतील हिंसाचारानंतर न्यायालयीन कोठडीत असलेले सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणामुळे राज्याचे वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ आज बीडमध्ये सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी दाखल झाले.

प्रकाश आंबेडकर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात दोघांमध्ये मागील तासाभरापासून चर्चा सुरु आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या निवासस्थानी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होत आहे. बीड आणि परभणीच्या विषयावर प्रकाश आंबेडकर मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. या भेटीनंतर प्रकार आंबेडकर नेमकं काय बोलणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ बीडमध्ये मूक मोर्चा

दरम्यान, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज बीडमध्ये मूक मोर्चा निघाला आहे. बीडमधील मूक मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मस्साजोग गाव बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मस्साजोग गावचे सर्व नागरिक मोर्चात सहभागी झाले आहेत. तसेच बजरंग सोनवणे, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, छत्रपती संभाजी राजे भोसले आणि मनोज जरांगेंसह अनेक नेते या मोर्चात सहभागी झाले आहेत. डॉ. आंबेडकर चौकातून मोर्चाला सुरुवात झाली असून मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मराठा क्रांती ठोक मोर्चाची मागणी

सरपंच संतोष देशमुख यांचं प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे, सर्व आरोपींवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात यावी, सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, याप्रकरणामध्ये ज्येष्ठ विधीतज्ज्ञ उज्ज्वल निकम व विधीतज्ज्ञ सतीश माणशिंदे यांची नियुक्ती व्हावी, हे प्रकरण बीड या ठिकाणी न चालवता मुंबई न्यायालायकडे वर्ग करण्यात यावे, अशी मागणी मराठा क्रांती ठोक मोर्चाने केली आहे.

## भारत-पाकिस्तान बॉर्डरवर क्रिकेट स्टेडियम बांधण्याचा सल्ला! एक गेट भारताकडून आणि...

नवी दिल्ली : काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचं वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले. भारताचे सामने पाकिस्तानबाहेर होणार हे स्पष्ट झालं असून वेळापत्रक समोर आल्यापासून चॅम्पियन्स ट्रॉफी पुन्हा चर्चेत आली आहे. विशेष म्हणजे यजमानपद पाकिस्तानकडे राहणार का यावरुन मागील काही महिन्यांपासून वाद सुरु होता. मात्र आता भारतीय संघ पाकिस्तान दौऱ्यावर जाणार नाही हे स्पष्ट झालं आहे. आयसीसीने हायब्रीड मॉडेलला परवानगी दिल्यानंतर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाने ते स्वीकारलं आहे.

दीड दशकाहून अधिक काळापासून भारतीय संघ पाकिस्तानात गेलाच नाही

२०२४ ते २०२७ दरम्यान खेळवण्यात येणाऱ्या आयसीसीच्या स्पर्धांमधील भारत-पाकिस्तान सामने दोघांपैकी कोणत्याही एका देशात खेळवले जाणार नसून त्रयस्त देशात खेळवले जातील, असं निश्चित करण्यात आलं आहे. दोन्ही देशांमध्ये असलेल्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. मागील दीड दशकाहून अधिक काळापासून भारताने पाकिस्तानचा दौरा केलेला नाही. पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाबरोबर आजी-माजी खेळाडूंकडूनही अनेकदा भारताने पाकिस्तान दौऱ्यावर यावं अशी विधानं थेट किंवा अप्रत्यक्षपणे करण्यात आली.

पाकिस्तानसाठी ही वाईट बातमी

मात्र आता पाकिस्तानमध्ये भारतीय संघ जाणार नाही हे समोर आल्यानंतर पाकिस्तानचा क्रिकेटपटू अहमद शेहजादने ही पाकिस्तानसाठी वाईट बातमी असल्याचं म्हटलं आहे. युट्यूबवर बोलताना अहमद शेहजादने, ''पाकिस्तानकडे भारतीय संघासाठी यजमान होण्याची ही सुवर्णसंधी होती. २०२१ मध्ये सर्व देशांच्या क्रिकेट मंडळांनी पाकिस्तानच चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचा यजमान असेल यावर सहमती दर्शवली होती. आता आयसीसी अशी माघार घेऊ शकत नाही. मला वाटतं पाकिस्तानने ही संधीही गमावली आहे. आता भारतीय संघ पाकिस्तानमध्ये कधीच येणार नाही. आता आपण भारतीय संघ पाकिस्तान येण्याची आस सोडून दिली पाहिजे. तुम्ही भारतीय संघाला केवळ आयसीसीच्या स्पर्धांच्या माध्यमातून आणू शकता,'' अशी आठवण करुन दिली आहे.

बॉर्डरवर बांधा स्टेडियम

भारतीय संघ पाकिस्तानच्या दौऱ्यावर जाणार नाही हे समजल्यानंतर नाराज झालेल्या अहमद शेहजादने एक अजब सल्ला दिला आहे. भारत आणि पाकिस्तानच्या अंतरराष्ट्रीय सीमेवर स्टेडियम बांधावे असा सल्ला अहमद शेहजादने दिला आहे. या स्टेडियमचं एक गेट पाकिस्तानमध्ये आणि दुसरं भारतात असावं असंही पाकिस्तानचा हा क्रिकेटपटू म्हणाला आहे. ''सीमेवर स्टेडियम बांधण्याचा सल्ला मी एका पॉडकास्टमध्ये दिला होता. एक गेट भारतात आणि दुसरं गेट पाकिस्तानच्या दिशेने असेल. दोन्ही देशांचे खेळाडू आपआपल्या देशाच्या बाजूला असलेला गेटमधून स्टेडियममध्ये प्रवेश करतील आणि खेळतील. मात्र यामध्येही बीसीसीआय आणि सरकारला अडचण असेल. त्यांचे खेळाडू आपल्या बाजूच्या दिशेने मैदानात फिल्डींगला येतील तेव्हा त्यांना व्हिजा लागेल. जो त्यांना दिला जाणार नाही,'' असं अहमद शेहजाद म्हणाला.

पाकिस्तानने केलेलं भारताला पराभूत

यापूर्वी २०१७ साली झालेल्या अखेरच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेमध्ये अंतिम सामन्यात पाकिस्तानने भारताला पराभूत केलं होतं. पाकिस्तान हे चॅम्पियन्स ट्रॉफीचे विद्यमान विजेते आहेत.

# रक्तदान व रक्ताक्षय (अनेमिया) चाचणी शिबिराचे आयोजन व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला सलग्नीत व श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद संचालित कृषी महाविद्यालय उमरखेड, यांच्या वतीने रक्तदान व रक्ताक्षय(अनेमिया) चाचणी शिबिराचे आयोजन व आरोग्य तपासणी शिबिराचे दि.२८/१२/२०२४ ला करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांच्याद्वारे मिळालेल्या निर्देशानुसार उज्वल भविष्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय सेवा योजना चांगल्या लोकांसाठी या ब्रीद वाक्याखाली विशेष शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत करण्यात आले.











या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कृषी महाविद्यालय उमरखेड येथील प्राचार्य डॉ. आर. एम. खान, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व प्राध्यापक श्री. एस. के. चिंतले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. व्ही. बि. शिंदे. मेडिकेअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल पुसद येथील तद्द डॉक्टर ची टीम रक्त पिशव्या व आरोग्य तपासणी करीत उपस्थित होते. तसेच राजाराम उत्तरवार कुटीर उपजिल्हा रुग्णालयात, उमरखेड येथील डॉ. अंकिता गाणंजेगावकर व त्यांच्या टीम सह रक्तक्षय तपासणी शिबीर राबिविले या वेळी ४० विद्यर्थ्यांची व २० गावकऱ्यांची रक्तक्षयाची तपासणी केली व ऐकून २५ राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनी व गावकऱ्यांनी देखील रक्तदान केले. व सोबतच ९० हून अधिक लोकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

या वेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक डॉ.संदीप हाडोळे व महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. विजयराव माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. ग्राम बारा च्या सरपंचा सौ.साधनाताई हरणे , उपसरपंच मा.श्री.नागोराव हरणे तसेच जि.प.शाळा बारा चे मुख्याध्यापक मा.श्री.जी .डी. लखमावाड ,मा.श्री रमेश काळे ( पोलिस पाटील ग्राम बारा.) व कृषि महाविद्यालयाचे सहायक शिक्षक श्री.वाय.एस.वाकोडे , श्री.ए.एस. राऊत श्री.टि.ए.चव्हान. श्री.ए. बी तामसेकर, श्री. के. व्ही.आगे व प्राध्यापिका पल्लवी घोटेकर व शितल गजभिये व इतर शिक्षकगण उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे ४० स्वंयसेवक व ग्राम बारा चे ग्रामवाशी यांची विशेष उपस्थिती लाभली.

# प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या तिघांवर शहर पोलिसांची कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्रतिबंधित नायलॉन मांजाचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून आज शहर पोलिसांनी स्थानिक मोची गल्ली भागात छापा मारुन तिघांवर कारवाई करत ७ हजार किंमतीचा घातक नायलॉन मांजा जप्त केला आहे. मकरसंक्रातीचा सण जवळ आल्यामुळे सर्वत्र पतंगबाजीला सुरुवात झाली आहे. मात्र पतंग उडवताना घातक अशा नायलॉन मांजाचा वापर होत असून यामुळे राज्यभरात अनेक दुर्घटना



घडत आहेत. नायलॉन मांजामुळे पक्षांचा मृत्यू होतो. तसेच काही ठिकाणी नागरिकही जखमी झाले आहेत. नायलॉन मांजा अडकल्याने जिल्ह्यात अनेकजण जखमी झाले आहेत. खामगाव शहरातही असे काही प्रकार घडले आहेत. यामुळे जिल्हा प्रशासनाने नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान शहर पोलिसांनी आज सकाळी स्थानिक मोची गल्ली भागात छापा मारुन नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या एका महिलेसह तिघांवर कारवाई करत त्यांच्या जवळून ७ हजार किंमतीचा प्रतिबंधीत नायलॉन मांजा जप्त केला आहे. पोलिसांनी नायलॉन मांजा विकणारे आशा सुनिल पवार, नरेंद्र सुरेश चव्हाण व जितेंद्र उत्तमचंद गोयल या तिघांवर शहर पोलिसांनी विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

## बंदी असलेल्या जीवघेण्या नायलॉन मांजामुळे गेल्या महिन्याभरात चार जण जखमी





**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात प्रतिबंधित असलेल्या नायलॉन मांजाची सर्रासपणे विक्री सुरू आहे. गेल्या महिन्याभरात या मांज्यामुळे चार जण गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या होत्या. आज मनोज जैस्वाल आणि त्यांचा मुलगा नमन जैस्वाल हे पिता-पुत्र या प्रतिबंधित मांज्यामुळे जखमी झाले आहेत. मनोज जैस्वाल हे आपल्या मुलाला शाळेत सोडण्यासाठी दुचाकीवरुन जात असताना कटलेल्या पतंगाचा मांजा गळ्यामध्ये अडकला. त्यानंतर ते वाचवण्याच्या प्रयत्नात असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने खाली कोसळले. त्यामध्ये पितापुत्र दोघेही जखमी झाले आहेत. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी व्यवसायिक प्रशांत राऊत हे या मांज्यामुळे गळा कापल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर उमरसरा परिसरात दुकानात जात असताना एका बालिकेच्या मानेला मांजा गुंडाळल्याने जखमी झाल्याची घटना घडली होती. या घटना ताज्या असतानाच आता पुन्हा दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली आहे. नायलॉन मांजावर बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांनी पंधरा दिवसांपूर्वी एक कारवाई केली होती. तरीही यवतमाळ शहरासह जिल्ह्यात त्याची सर्रास विक्री सुरू आहे तरी पोलिसांनी याकडे लक्ष द्यावे व कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# मुलींनो आई-बापाची मान कधी खाली जाऊ देऊ नका : ठाणेदार अजिनाथ मोरे

## सरस्वती विद्यालयात ठाणेदार यांनी केले समुपदेशन



दैनिक आपला विदर्भ

**जाणेफळ/प्रतिनिधी :** आई -वडील आपल्या पाल्यासाठी रात्रंदिवस झटतात झीजतात, मात्र काही मुली सोसिअल मीडियाच्या माध्यमातून चुकीच्या मुलांच्या नादी लागून, आपले आयुष्य उध्वस्त करून घेतात, आणि मग त्याच बापाला शरमेने स्टेशन मध्ये यावे लागते. आमच्यासाठी हा फार वाईट आणि दुःखद अनुभव असतो. त्यामुळे आपल्या आई-वडिलांची मान शरमेने खाली जाईल असे कोणतेही कृत्य करू नका असे परखड मत जानेफळ पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी मांडले.

ते सरस्वती विद्यालय व सरस्वती कन्या विद्यालयातील ९व १०विच्या मुलींच्या समुपदेशन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मंचावर अध्यक्ष म्हणून श्री सरस्वती वि. तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रामदास धामोडकर हे होते.

प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य गजानन जाधव, पर्यवेक्षक प्रा.डॉ.शिवाजी म्हस्के, मुख्याध्यापिका सौं. मीनल जोहरे, शिक्षक विष्णू गाडेकर, विनोद बाहेकर, प्रवीण खरात, सुनील घुगे उपस्थित होते.

सुरवातीला सहायक पोलीस निरीक्षक अजिनाथ मोरे यांचा सरस्वती विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपप्राचार्य गजानन जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात १६वर्ष धोक्याचं नसून ते मोक्याचं असल्याच स्पष्ट केलं. आपण अगदी सामान्य कुटुंबातून आलो असून यापुढे आपल्या वेळेचा सदुपयोग करण्याचा संकल्प करा. तुमचं पुढच भविष्य उज्वल होईल असे मत त्यांनी मांडले. तर प्रमुख मार्गदर्शक ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी सोशल मीडियाचा होणारा गैरवापर आणि त्यातून मुलींची कशी फसवणूक होते तसेच यापुढे १५ ते २१ या संवेदनशील काळात स्वतःची काळजी घेतली तर, पुढे म्हतारपणापर्यंत तुम्हाला स्वतःची काळजी घेण्याची गरज पडणार नाही. आई आणि वडील हे आपले खरे दैवत असून त्यांची मान कधी झुकू देऊ नका असे मत मांडले. प्राचार्य योगगुरू रामदास धामोडकर यांनी असे उपक्रम राबवित असल्याबद्दल ठाणेदार यांचे आभार मानले.तर सूत्रसंचालक डॉ. कृष्णा हावरे यांनी १००० मुलांमागे ८५० मुली असून १५० मुलं छपरी आणि बेजबाबदार मुलं मिरवणूक, लग्न यात नाचतांना दिसत आहेत. हीच मुलं आपला मोबाईलच्या माध्यमातून मुलींना फसवीत असून, येत्या काळात सजग राहण्याचे आवाहन त्यांनी मुलींना केले. या कार्यक्रमाचे भावनिक सूत्रसंचालन डॉ. कृष्णा हावरे यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य गजानन जाधव यांनी केले.

## तरुणीबरोबरच्या त्या व्हायरल फोटोवर आमदार संदीप क्षीरसागर यांची मोठी प्रतिक्रिया

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उचलणारे आणि आरोपींच्या अटकेची मागणी करणारे आमदार संदीप क्षीरसागर यांचे एका तरुणीबरोबरचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले जात आहेत. यावर आज त्यांनी प्रतिक्रिया दिली. विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनापासून संदीप क्षीरसागर यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींना अटक करण्याची मागणी आक्रमकपणे लावून धरली. त्यानंतर आज बीड येथील मोर्चात सहभागी झाल्यानंतर त्यांनी व्हायरल फोटोबाबत खुलासा केला. संदीप क्षीरसागर हे बीड विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातून सलग दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. संदीप क्षीरसागर म्हणाले, ''सध्या समोर येत असलेला फोटो निवडणुकीदरम्यान व्हायरल करण्यात आला होता. तो फोटो मॉर्फ केलेला आहे. मी कधीही इनशर्ट करत नाही. मी शर्ट बाहेर सोडलेले असते. या फोटोबाबत मी तक्रार केलेली असून फॉरेन्सिक तपासणीसाठीही सदर फोटो पाठवून दिला आहे. संतोष देशमुख प्रकरणात मी आवाज उचलू नये, म्हणून मला शांत करण्यासाठी असला प्रकार केला जात आहे. पण यानिमित्ताने एक सांगतो मी कुणाच्या बापाला घाबरत नाही.'' ''सदर फोटो व्हायरल झाल्यानंतर तो सर्वात आधी मी माझ्या पत्नीला दाखवला होता. पत्नीही तो फोटो पाहून हसली होती. राजकारणात कोणत्या स्तरापर्यंत जाऊ शकतात, हे त्या फोटोवरून दिसते. निवडणूक काळात तो फोटो व्हायरल करूनही लोकांनी मला विजयी केले. कारण लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. आगामी अधिवेशनात अशा मॉर्फ फोटोबाबत काहीतरी नियमावली असावी, अशी मागणी करणार आहे'', असेही संदीप क्षीरसागर म्हणाले.

# रात्रीच्या वेळेस अवैद्य रेती वाहतूक करणाऱ्यांना कोणाचे अभय

## महसूल व पोलिस विभागाच्या रेती तस्करांवर होणाऱ्या कारवाया भगवान भरोसे


दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवर असलेले लोणार शहर हे अवैद्य रेती तस्करीचे केंद्रबिंदू बनलेले आहे. शहरातून अवैद्य रेती वाहतूक करणाऱ्या रेती तस्करांनी महसूल विभागाची लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी लोणार पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. तरीही रेती तस्कर पुष्पा पॅटर्ण राबवीत रात्रीच्या वेळेस अवैद्य रेती वाहतूक करत असल्याची माहिती समोर येत आहे.

महसूल अधिकार्यांच्या दुर्लक्षितपणामुळे लोणार तालुक्यातून मोठय़ा प्रमाणात दररोज हजारो ब्रास अवैद्य रेती वाहतूक होऊन कोट्यवधी रुपयांचा शासनाचा महसूल बुडत असल्याबाबत चर्चा होत आहेत. त्यातच अवैद्य रेती वाहतूक कारवाई प्रकरणात दंड भरणा चलन मध्येही खोडखाड करून महसूल विभागाची फसवणूक केल्याचा प्रकार लोणार पोलिस स्टेशनला दाखल झालेल्या तक्रारीतून उघडकीस आला आहे. असे असतांना रेती तस्कर आता पुष्पा झुकेगा नही असे म्हणत महसूल विभागाला गुंगारा देत रात्रीच्या वेळेस अवैद्य रेती वाहतूक करत असल्याची माहिती सुत्रांच्या मार्फत समोर येत आहे. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा वचक रेती माफियांवर का राहिला नाही? अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

रेती उपसा बंद असतानाही शहरातून रेती वाहतूक होत आहे. तसेच रात्री होणाऱ्या अवैद्य रेती वाहतुकीला अभय कोणाचे आहे असाही प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाचा बुडणारा महसूल आणि अवैद्य रेती वाहतूक व साठवणूक यावर स्थानिक प्रशासनाकडून होत असलेल्या भगवान भरोसे कारवायावर बुलढाणा



जिल्हाधिकारी काय निर्णयक भूमिका घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चार दुर्मिळ चांदी अस्वलांचा मृत्यू, जंगलाला लागून असलेल्या मार्गावरील वाहतूक ठरतेय कर्दनकाळ

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** जंगलाला लागून असलेले मार्ग वन्यप्राण्यांच्या मृत्यूसाठी कारणीभूत ठरत आहेत. चंद्रपूर-मूल महामार्गावरील डोनी फाट्याजवळ दोन दुर्मिळ चांदी अस्वलांचा वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी रात्री उघडकीस आली. यापूर्वी मूल जवळ आणि विसापूर टोल नाक्याजवळ अपघातात चांदी अस्वलांचा मृत्यू झाला असून, जिल्ह्यात ४ चांदी अस्वलांचा मृत्यू झाल्याची नोंद हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीने केली आहे



चंद्रपूर-मूल मार्गावर रोजच एखादा पक्षी, साप, तृणभक्षी, मांसभक्षी प्रकारातला वन्यप्राणी मृत्यूमुखी पडतो. हा राष्ट्रीय महामार्ग ९३० क्रमांकाचा असून, या राष्ट्रीय महामार्गावर वन्यप्राण्यांसाठी उपशमन योजना राबविण्यात येणार आहे. परंतु, हे काम रखडून पडले असून, वन्यजीवांना याची किंमत मोजावी लागत आहे. हाच महामार्ग पुढे गडचिरोली-धानोरा- मुरमगावपर्यत जातो. धानोरा भागात सुद्धा संख्या कमी होत चाललेल्या तडसाचा अनेकदा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, अशी माहिती हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीने दिली. घटनास्थळी हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीचे अध्यक्ष दिनेश खाटे, अमित देशमुख, ओमकार मत्ते, संजीवणी पर्यावरण संस्थेचे उमेश झिरे, तन्मय झिरे, वनविकास महामंडळाचे सहाय्यक वनरक्षक आर. एस. कदम, वनपरिक्षेत्र अधिकारी बोथे, वनरक्षक कुमरे उपस्थित होते. तर मुल व विसापूर येथेही चांदी अस्वलाचा मृत्यू आला. चार चांदी अस्वलाचा अपघातात मृत्यू आल्याने या मार्गावर वाहन चालकांना वेगावर नियंत्रण ठेवण्याची मर्यादा असतानाही सुसाट वेगात वाहन धावत असल्याने वन्य जीव प्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे.




## विविध वृत्त...

### कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ७० बुलेट वाहनांचे सायलेन्सरवर फिरविला रोडरोलर




दैनिक आपला विदर्भ

**धुळे /प्रतिनिधी :** कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ७० बुलेट वाहनांचे सायलेन्सर काढून शहरातल्या जय हिंद चौकात रोडरोलर फिरवत सायलेन्सर स्क्रॅप करण्यात आले आहे. शहर वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईचं नागरिकांमधून कौतुक केलं जात आहे. यापुढे देखील कर्नकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट धारकांसह वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी यावेळी दिला. या कारवाईदरम्यान शहर वाहतूक शाखेने एक लाख बारा हजार रुपयांचा दंड देखील वाहनधारकांना करण्यात आला आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्यांना आळा बसावा या उद्देशाने २० डिसेंबर ते आज पर्यंत धुळे शहरातल्या अनेक भागातून धुळे शहर वाहतूक शाखेच्या वतीने कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट धारकांसह वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती आणि आज जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या उपस्थितीत ७० सायलेन्सर वर रोड रोलर फिरवत कारवाई करण्यात आली आहे.

### शहरात फिरता नारळीय ४९ व्या कार्यक्रमानिमित्त माऊली रथ व पादुकांची भव्य शोभायात्रा, भाविक मंत्रमुग्ध





दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार बालशहिदांच्या भूमीत श्री संत श्रेष्ठ निवृत्ती महाराज पदयात्रा सोहळा निमित्ताने, नंदुरबार शहरात आज फिरता नारळीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले ४९ वर्ष पूर्ण झाले त्या अनुषंगाने या फिरता नारळीय कार्यक्रमाचे, नंदुरबार शहरातील गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालयाच्या भव्य अशा मैदानावर या फिरता नारळीय ४९ व्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माऊली रथ व पादुकांची भव्य शोभायात्रा शहरातील धुळे चौफुलीपासून सुरू करण्यात आली होती, तसेच सदर शोभायात्रा ही मोठा मारुती छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर मार्गे, आयटीआय रस्त्यावरून थेट गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर दाखल झाली, या ठिकाणी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने दाखल झालेल्या वारकरी संप्रदायासह संपूर्ण भाविकांसाठी, भव्य रिंगण सोहळा,नारळी कार्यक्रम, हरिपाठ ,गीतापाठ,व जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमासाठी हजारो च्या संख्येने भाविक सहभागी झाले.